दिनांक : ११/०८/२०१६

# सूचना
## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती
## मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, पारसी व जैन अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी
## इयत्ता ११ वी ते पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी

जे विद्यार्थी मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, पारसी व जैन अल्पसंख्याक समाजात असतील त्यांनी आपला नवीन व नूतनीकरणाचे शिष्यवृत्ती अर्ज www.scholarship.gov.in **या वेबसाईट वर भरणेचे आहेत. इ. ११ व १२ वी मधील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी दि.३१.०८.२०१६ पर्यंतच ऑनलाईन अर्ज भरुन दिनांक १५.०९.२०१५** पर्यंत कार्यालयात सौ.पवार यांच्याकडे जमा करावयाचे आहेत. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**अर्जकरण्यासाठी खालील किमान पात्रता व अटी**

WILLINGDON COLLEGE SANGLI

Principal
Willingdon College, Sangli

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
२. मागील वर्षी परीक्षेत किमान ५० % गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२,००,०००/- लाख इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. एखाद्या विद्यार्थ्यांने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८. विद्यार्थ्याचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.
९. आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्यांने आपले अर्ज प्राचार्यांमार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.

**अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचे फोटो स्वाक्षरीसह असावा.
२. माध्यमिक शालांत परीक्षा दहावी पासून उत्तीर्ण सर्व परीक्षांच्या गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत
३. कायम निवासाच्या पत्तयासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिका, वीज/ फोन बील निवडणुक ओळखपत्र, आधार कार्ड यापैकी कोणत्याही एका पुराव्याची छायांकित प्रत जोडावी.
४. विद्यार्थ्याने अल्पसंख्यांक दर्जाबाबतचे, तसेच पालकांचे सन २०१५-१६ चे वार्षिक उत्पनांचे स्वयंघोषित घोषणापत्र रेव्हेन्यू स्टँप लावून अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
५. बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोडची नोंद असेल याची झेरॉक्स. सदर बँक खाते चालू स्थितीत असावे.
६. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.
७. वरील सर्व कागदपत्रे ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहेत. ऑनलाईन अर्जात दिलेली कागदपत्रे उदा.विद्यार्थ्यांचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र, विद्यार्थ्यांचे घोषणापत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट इ. प्रपत्र डाउनलोड करुन प्रिंट काढून त्यातील माहिती भरुन नंतर ती कागदपत्रे स्कॅन करुन ती अपलोड करावयाची आहेत.

## नवीन मंजूरीसाठी अर्ज करण्याची पध्दत :

१. अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याच्या पासबुकावर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकून नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Temporary Application ID प्राप्त होईल. हा ID वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा ID विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे.
३. ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी योजनेची मार्गदर्शक तत्वे वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.